# <u>फळसेवाडी हितकारी संस्था</u>

**वार्षिक सर्वसाधारण सभा**

उपरोक्त संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक 02 एप्रिल 1995 रोजी स्थळ शिरोडकर हायस्कूल, परेल, मुंबई – 400 012 या ठिकाणी आयोजित करण्यात आलेली आहे तरी सर्व सभासद बंधुनी सायंकाळी 4:00 वाजता वेळेवर उपस्थित राहावे हि विनंती.

सुनिल सदानंद राणे
चिटणीस

पुर्नलिखित इतिवृत्त
मुळ दस्तऐवज : MR-04-(36 to 41)

## <u>फळसेवाडी हितकारी संस्था</u>
### वार्षिक सर्वसाधारण सभा

**दिनांक** : रविवार 02 एप्रिल 1995
**स्थळ** : शिरोडकर हायस्कूल, परेल, मुंबई – 400 012.

**उपस्थिती**

| | |
|---|---|
| 1. श्री सुनिल सदानंद राणे | 13. श्री वासूदेव बाबू राणे |
| 2. श्री उदय भगवान राणे | 14. श्री दत्ताराम विष्णु साटम |
| 3. श्री प्रकाश हरिश्चंद्र राणे | 15. श्री विलास पुंडलीक राणे |
| 4. श्री अभयनाथ भगवान साटम | 16. श्री प्रताप विठोबा राणे |
| 5. श्री पाडूरंग सावजी राणे | 17. श्री सु बा राणे |
| 6. श्री रविन्द्र भगवान राणे | 18. श्री अशोक राणे |
| 7. श्री बाळाजी (आबा) दिनकर राणे | 19. श्री लवू शिवाजी राणे |
| 8. श्री श्रीधर आत्माराम राणे | 20. श्री शंकर बाळकृष्ण राणे |
| 9. श्री भास्कर दौलत राणे | 21. श्री सत्यवान गणपत सावंत |
| 10. श्री मधूकर संभाजी राणे | 22. श्री आनंद नारायण साटम |
| 11. श्री सचिन झिलू राणे | 23. श्री यशवंत तुकाराम सावंत |
| 12. श्री मेघश्याम नारायण राणे | 24. श्री विठोबा नाना राणे |

उपरोक्त संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा शिरोडकर हायस्कूल परेल, मुंबई 400 012 या ठिकाणी ठीक 5:30 वाजता घेण्यात आली. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष श्री प्रताप विठोबा राणे हे उपस्थित होते. या सभेस एकूण 24 सभासद उपस्थित होते. सभा सुरू होण्यापूर्वी वाडीतील दिवंगत व्यक्तीना दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली वाहण्यात आली. तसेच संस्थेचे माजी अध्यक्ष श्री वासूदेव बाबू राणे व महाराष्ट्र शासन पुरस्कृत गुणवंत कामगार विजेत श्री प्रताप विठोबा राणे यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

**<u>विषय क्रमांक 1</u>**
दिनांक 28 फेब्रुवारी 1993 रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.
दिनांक 28 फेब्रुवारी 1993 रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त मंजूर झाल्यावर मा. अध्यक्ष यांनी त्यावर स्वाक्षरी केली .

**<u>विषय क्रमांक 2</u>**
1993 ते मार्च 1995 या कालावधीत चिटणीसांनी केलेल्या अहवालास मंजूरी घेणे
हा अहवाल सर्व सभासदांना मिटींगपूर्वीच देण्यात आल्यामुळे त्याचे वाचन न होत त्यावर साधक-बाधक चर्चा करून तो मंजूर करण्यात आला.

**<u>विषय क्रमांक 3</u>**

1993 ते मार्च 1995 जमाखर्चास मंजूरी देणे

1993 ते मार्च 1995 या कालावधीतील जमाखर्च सभेपुढे सादर करण्यात आला व त्यावर पुढील सूचना करण्यात आल्या.

पुर्वी ठरल्याप्रमाणे 1993-94 व 1994-95 रु.2/- याप्रमाणे वर्गणी पावती फाडली असेल तर ती प्रत्येक सभासदास देण्यात यावी व उरलेली रक्कम व त्यावरील व्याज याचे स्वतंत्र खाते राष्ट्रीयकृत बँकेत उघडून तीन सभासदांच्या नावे हे पैसे ठेवावेत व 1995-96 ची वर्गणी जमा करून त्याचे स्वतंत्र खाते उघडावे ही सूचना श्री दत्ताराम विष्णु साटम यांनी सूचविली ती सर्वानुमते मंजूर करण्यात आली.

या सूचनेसहीत 1993 ते मार्च 1995 या कालावधीतील जमाखर्चास मंजूरी देण्यात आली.

**<u>विषय क्रमांक 4</u>**

सत्कार समारंभ – माननिय आमदार श्री नारायण तातू राणे, कणकवली-मालवण मतदार संघातून पुन्हा निवडून येऊन त्यांचा दुग्ध व्यवसाय व पशु संर्वधन मंत्री या नात्याने अभिनंदनाचा ठराव मांडण्यात येऊन तो सर्वानुमते मंजूर करण्यात आला. तसेच आपल्या संस्थेतर्फे जाहीर सत्कार करावा अशी सूचना मांडण्यात आली. हा सत्कार वनमाळी सभाग्रह अथवा शिवाजी मंदिर (दादर) येथे घेण्यात यावा असे ठरले.

ह्या विषयावर संस्थेचे अध्यक्ष श्री प्रताप विठोबा राणे यांनी अशी सूचना दिली की आपण हा सत्कार श्री रविन्द्र नाट्यमंदिर या ठिकाणी घेऊन साऊन्ड ऑफ म्युझिक हा वाद्यवृंन्द (ऑर्केस्ट्रा) मी आयोजित करतो त्यासाठी सुमारे रु.20,000/- (रुपये वीस हजार फक्त) खर्च येणार आहे तो आपण तिकीट विक्री रुपाने उभा करू शकतो. प्रत्येक सभासदाने कमीत कमी रु.200/- किंमतीची 10 तिकीटे संपविण्याची जबाबदारी घ्यावी.

तिकीटे खालील किंमतीप्रमाणे छापण्यात येतील.

| | |
|---|---|
| दर रु.50/- | 50 तिकीटे |
| दर रु.20/- | 650 तिकीटे |

वरील विषयावर चर्चेमधून सर्वश्री पांडूरंग सावजी राणे, मेघश्याम नारायण राणे, भास्कर दौलत राणे व दत्ताराम विष्णु साटम यांनी प्रामुख्याने या चर्चेत विशेष भाग घेतला.

**<u>विषय क्रमांक 5</u>**

पुढील कार्यकालावधीसाठी कार्यकारीणीची निवड – या विषयावर सभाग्रहामध्ये चर्चा होऊन संस्थेच्या कार्यकारीणीने असा निर्णय दिला की पुढे बरीच कामे करावयाची बाकी आहेत त्यासाठी सध्याची कमिटी कार्यरत आहे तीच पुढे चालू ठेवावी व त्यांनी पुढील कार्यभाग सांभाळावा. फक्त श्री वसंत भिकाजी राणे हे सध्या सेवानिवृत्त होऊन गावी स्थायिक झाले आहेत व त्यांना स्वत:ला संस्थेचे सभासदत्व पुढे चालू ठेवायचे नसल्यामुळे त्यांच्या जागी श्री भास्कर दौलत राणे यांची निवड करण्यात आली. त्यासाठी कार्यकारीणी पुढील प्रमाणे –

| | |
|---|---|
| श्री प्रताप विठोबा राणे | अध्यक्ष |
| श्री रामकृष्ण भगवान राणे | उपाध्यक्ष |
| श्री सुनिल सदानंद राणे | चिटणीस |
| श्री उदय भगवान राणे | खजिनदार |

**कार्यकारीणी सदस्य**

1. श्री मधुसूदन श्रीधर राणे
2. श्री सुरेश रघुनाथ राणे
3. श्री रमेश रघुनाथ राणे
4. श्री शंकर बाळकृष्ण राणे
5. श्री गंगाराम महादेव राणे
6. श्री पांडूरंग सावजी राणे
7. श्री भास्कर दौलत राणे
8. श्री दिलीप मधुकर राणे

**सल्लागार**

सर्वश्री दत्ताराम विष्णु साटम व अविनाश कृष्णाजी राणे

**हिशेब तपासणीस**

सर्वश्री अविनाश कृष्णाजी राणे व प्रशांत काशिनाथ राणे

**विषय क्रमांक 6**

पुढील कार्यकारीणीची ध्येयधोरणे ठरविणे

या संर्दभात वाडीतील पाणी प्रश्न, रस्ता व  इतर विषय (अध्यक्षांच्या परवानगीने येणारे) ह्या विषयांवर सभासदांनी चर्चा केली. चर्चा अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. शेवटी चिटणीसांनी जमलेल्या सर्व सभासदांचे आपला बहुमुल्य वेळ खर्च करून उपस्थित राहील्याबद्दल आभार मानले. तसेच शिरोडकर विद्यालय, परेल यांनी सभेसाठी वर्ग उपलब्ध करून दिला त्याबद्दल त्यांचे आभार मानले. या मिटींगच्या वेळी उपस्थित सभासदांना चहापाणी खर्च संस्थेचे अध्यक्ष श्री प्रताप विठोबा राणे व श्री सत्यवान गणपत राणे यांनी केला त्याबद्दल संध्याकाळी 7:10 वाजता संपली असे घोषित केले.

---

श्री सुनिल सदानंद राणे
चिटणीस

श्री प्रताप विठोबा राणे
अध्यक्ष

पुर्नलिखित इतिवृत्त
मुळ दस्तऐवज : MR-04-(36 to 41)